माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १०५/२०२३**

| **तक्रारकर्ता** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. रविंद्र पाडुरंग शेगावकर, रा. प्लॉट क्र. ११२ भांडारकर ले आऊट, बायपास चौक, उमरेड-४४१२०३ | कर निरीक्षक, नगर परिषद कार्यालय उमरेड, ता. उमरेड जि. नागपूर | मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालया उमरेड ता. उमरेड जि. नागपूर |

## सुनावणी दिनांक ११.०६.२०२५

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १६५२/२०२० मध्ये दिनांक ०४.०७.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित असून त्यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केली नाही. जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, नगर परिषद, उमरेड जि. नागपूर श्री. शंकर मारोती नेहारे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे सहायक कार्यालय अधिक्षक, नगर परिषद उमरेड श्री. राहुल सोमनाथ राऊत उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १६५२/२०२० मध्ये दिनांक ०४.०७.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये शासन परिपत्रक दिनांक १७ ऑक्टो २०१४ चा दाखला देत लोकहिताचे दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा त्रयस्थ पक्षाबरोबर उदघवलेल्या वैयक्ति वादाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती देता येणार नाही असे अपिलार्थीस कळविले. त्यावर दाखल प्रथम अपिल अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी श्री. सुभाष बाबूलालजी गुप्ता यांनी मालमत्तेच्या फेरुरासाठी आपल्या कार्यालयात सादर केलेले संपूर्ण दस्ताऐवज ईसारपट्टी मालमत्तेचे खरेदी पत्र आपले कार्यालयीन नोटीस आणि कर निर्धारण पावतीची माहिती मागितलेली आहे. श्री. सुभाष बाबूलालजी गुप्ता यांच्या मालमत्तेच्या बाजुन अपिलार्थी यांचे दुकान असल्याने त्यांचे हितसंबध त्यामध्ये गुंतलेले आहे. त्यामुळे सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबधीत होत नसून अपिलार्थी यांना सदर माहिती देय ठरते. त्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने कलम २ (च) नुसार कार्यालयात उपलब्ध माहिती अपिलार्थीस विनामुल्य

पुरवावी, ” या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे, असा आदेश पारित करण्यात आला.

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक ११.०४.२०२३ (प्राप्त दि. १२.०४.२०२३) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, “ अपिलार्थीने मालकी हक्काने विकत घेतलेला दुकानाचा कमरा दि. ०९.०३.२००५ आणि श्री. सुभाष बाबुलालजी गुप्ता यांनी मालकी हक्काने विकत घेतलेली संपूर्ण मालमत्ता दि. १९.०१.२०१३ यामधील दोघांच्याही खरेदी पत्रात स्थावर मालमत्तेच वर्णन, चतु:सिमा, अटी व शर्तीमध्ये खुपच तफावत आहे. १) त्यामुळे श्री. सुभाष बाबुलालजी गु ता यांनी सादर केलेली इसारपट्टी अपिलार्थीस देण्याचे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.
२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांना शास्ती लावण्यात यावी ” अशी आयोगास विनंती केली आहे.

**युक्तीवाद/खुलासा**: आज सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. उपस्थित जनमाहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, नगर परिषद, उमरेड यांनी व्दितीय अपील क्र. १६५२/२०२० मध्ये दिनांक ०४.०७.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार दि. ०६.०२.२०२३ रोजी तक्रारकर्ता यांना श्री. सुभाष गुप्ता यांचे मालमत्ता क्र. ९८५९ (अ) चे फेरफार संबधात विक्रीपत्र व असेसमेन्ट रजिस्टरची प्रत उपलब्ध आहे. त्यानुसार सदर माहिती आपणास उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे कळविले होते. परंतु तक्रारकर्ता यांनी श्री. सुभाष बाबुलालजी गुप्ता यांनी सादर केलेली इसारपट्टी अपिलार्थीस देण्याचे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

**निष्कर्ष**: सदर तक्रारी संदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की,
१. आज सुनावणीस प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय उमरेड, ता. उमरेड जि. नागपूर हे कोणतीही पूर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. सुनावणीच्या दिवशी त्यांनी त्यांचे प्रतिनिधी श्री. राहुल राऊत, सहा. कार्यालय अधिक्षक, नगर परिषद उमरेड यांना पाठविले आहे. यापुढील सुनावणीस प्रतिनिधी पाठवितांना सुनावणीच्या आधीच प्राधिकृत करण्यात आल्याचे पत्र आयोगास सादर करणे आवश्यक आहे. यापुढे त्यांच्याकडून असे वर्तन घडल्यास त्यांच्याविरुध्द माहिती अधिकार कायदा, २००५ कायद्यातील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि०१/१२/२०१५ नुसार कठोर कारवाई केली जाईल.

२. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीनुसार ईसारपट्टी , मालमत्तेचे खरेदी पत्र अभिलेखावर उपलब्ध नसल्याची खारतजमा करून स्पष्ट विवक्षीत कारण नमूद करून तक्राकरर्ता यांना कळविणे आवश्यक आहे.

# आदेश

१) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून एक पथक गठीत करुन १५ दिवसांच्या आत कसून शोध घेण्यात यावा आणि माहिती आढळून आल्यास अपिलार्थींना सदर माहिती समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलकर्ता यांना पाठवावे.

२) या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ११.०६.२०२५

जा.क्र. 3193 दि. 24 JUN 2025

E:\SD/11.06.2025/तक्रार क्र. 105-2023 शेगावकर